# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
## विशेष कक्ष
## परिपत्रक क्र.०४/२०२६

**विषय :** बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करताना सामाजिक आरक्षणा सोबत समांतर आरक्षण प्रमाणित करणेबाबत......

**संदर्भ :**

१. महाराष्ट्र शासन अधिसूचना : दि.०७/०४/२०२२
महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१

२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण.२०१९/प्र.क्र. ९४/१९/विशि.१, दि. ११/०४/२०२२

३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६—अ, दि. २५ जानेवारी, २०२४ व महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकिर्ण२०२४/ई७२२५५०/विशि—१, दि. २९ जानेवारी, २०२४ निर्गमित करण्यात आलेले परिपत्रकानुसार महिला, दिव्यांग, अनाथ व खेळाडू करिता निश्चित करण्यात आलेल्या समांतर आरक्षण अमंलबजावणीची कार्यपध्दती नुसार सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शा.शि.संचालक या शिक्षकीय संवर्गातील पदभरतीकरिता अमलबजांवणी करणेबाबतची सर्व जबाबदारी हि संस्था/महाविद्यालय नियुक्ती प्राधिकारी यांची राहील .

४. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अनुसार शासन सरळसेवा पदभरतीमध्ये दिव्यांग आरक्षण अंमलबजावणीची कार्यपध्दतीबाबतचा सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दि. २९ मे, २०१९ व सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : दिव्यांग २०२५/प्र. क्र६७/आरक्षण—१, दि. ३१ जूलै, २०२५ नुसार दिव्यांग समांतर आरक्षण अंमलबजावणी करणेबाबतची सर्व जबाबदारी संस्था/महाविद्यालयाच्या नियुक्ती प्राधिकारी यांची राहील असे कळविण्यास मान्यता असावी.

५. महिला, दिव्यांग, अनाथ व खेळाडू करिता निश्चित करण्यात आलेल्या समांतर आरक्षण अमंलबजावणी करण्यात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णय, परिपत्रक व अधिनियम नुसार करण्यात येत आहे.

६. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडून मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांना दिनांक ०१/१०/२०२५ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी सहाय्यक प्राध्यापक/शारीरिक शिक्षण संचालक/ग्रंथपाल या सवर्गातील पदे वाटप करण्यात आले बाबत प्राप्त होणारे पत्र व त्या प्रत्रामधील सर्व संदर्भ तसेच अटी व शर्ती.

७. विशेष कक्ष विभागाचे परिपत्रक क्रमांक ०१/२०२६,
जा. क्र. विशेष कक्ष/बिंदूनामावली शिबीर—२०२६/८६, दि. ०४ एप्रिल, २०२६. मधील सर्व व अटी व नियम

८. विशेष कक्ष विभागाचे परिपत्रक क्रमांक ०२/२०२६,
जा. क्र. विशेष कक्ष/बिंदूनामावली शिबीर—२०२६/१००, दि. १७ एप्रिल, २०२६ मधील सर्व व अटी व नियम.

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयांकित संदर्भ क्रमांक ०६ येथिल पत्रानुसार विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांना दिनांक ०१/१०/२०२५ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणाऱ्या सहाय्यक प्राध्यापक/शारीरिक शिक्षण संचालक/ग्रंथपाल या संवर्गातील पदभरती करिता आवश्यक प्राथमिक बिंदूनामावली तपासणी संदर्भ क्रमांक ०७ व ०८ नुसार करून देण्याबाबतची कार्यवाही विशेष कक्ष विभागाकडून सुरू आहे.

आता, प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/मवि–१/पदभरती/बिंदुनामावली/ई२६९३४५८, दि. १८ मे, २०२६ च्या पत्रानुसार बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करताना सामाजिक आरक्षणा सोबत समांतर आरक्षण प्रमाणित करून घेण्याबाबत कळविले आहे.

तेव्हा, सहाय्यक प्राध्यापक/शारीरिक शिक्षण संचालक/ग्रंथपाल या सवंर्गातील पद भरतीबाबतच्या पत्रानुसार आरक्षण विहित करून देण्यात आलेल्या (प्राथमिक बिंदूनामावली तपासणी) व इतर शैक्षणिक संस्था/महाविद्यालयाकडील नियुक्ती प्राधिकारी यांनी उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ५ नुसार सोबत जोडलेले नमुना **प्रपत्र — ब** व **प्रपत्र — क** नुसार समांतर आरक्षण निश्चित करून, ते विशेष कक्ष विभागाकडून प्रमाणित करून घ्यावे.

समांतर आरक्षणाबाबत त्या–त्या वेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व सूचना यानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची असल्याने, **प्रपत्र ब** व **प्रपत्र क** मधिल माहिती अचूक असल्याची खात्री संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी करणे बंधनकारक राहील. यामध्ये भविष्यत त्रृटी अथवा कायदेशीर अडचणी उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्था/महाविद्यालयाची राहिल.

**सोबत** :— **प्रपत्र ब** व **प्रपत्र क**

संदर्भ : जा.क्र.—विशेष कक्ष/बिंदुनामावली शिबीर—२०२६/241

दिनांक : 02 JUL 2026

आदेशावरून,

उपकुलसचिव,
तथा प्राथमिक बिंदुनामावली तपासणी अधिकारी
विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रति**:—

१) प्राचार्य/संचालक, शिवाजी विद्यापीठ संलग्नित सर्व अनुदानित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था.
२) इंटरनेट विभाग, शिवाजी विद्यापीठ विशेष कक्ष लिंकवर प्रसिध्द करणेसाठी

(तीन प्रतिमध्ये सादर करण्यात यावे)

**नमुना — प्रपत्र ब**

**संस्थेचे नाव :—**

**महाविद्यालयाचे नाव :—**

**महिलांसाठी सरळसेवा भरतीमध्ये ३० % आरक्षणानुसार माहितीचा तक्ता**

**दि. ३१/०८/२०२५ चा गोषवारा**

अनुदानित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर कार्यालयाचे अद्यावत अनुज्ञेय पदमान्यता पत्र.
**(दिनांक ०१/१०/२०२५ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय) सोबत पत्राची प्रत जोडावी.**

अ) जा.क्रं.विससं/उशि/कोवि/——————————
ब) जा.क्रं.विससं/उशि/कोवि/——————————
क) जा.क्रं.विससं/उशि/कोवि/——————————

**एकूण मंजूर पदानुसार** (खालील तक्ता भरण्यात यावा) —

| पदनाम | विषय | मंजूर पदे | अ. जा. | अ. ज. | वि जा अ | भ ज ब | भ ज क | भ ज ड | इ मा व | वि मा प्र | एस. ई. बी. सी | ई डब्ल्यु एस | अराखीव | एकुण | मंजुर पदावर प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या महिलांची एकुण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहा. प्राध्या./ शारिरिक शिक्षण संचालक/ ग्रंथपाल | १ | | | | | | | | | | | | | | |
| | २ | | | | | | | | | | | | | | |
| | ३ | | | | | | | | | | | | | | |
| | ४ | | | | | | | | | | | | | | |
| | ५ | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | |

दि. / /२०२६ नियुक्ती प्राधिकारी/अध्यक्ष/सचिव
सही व शिक्का

संस्था सिल

(तीन प्रतिमध्ये सादर करण्यात यावे)

**नमुना — प्रपत्र क**

**संस्थेचे नाव :—**

**महाविद्यालयाचे नाव :—**

## समांतर आरक्षणाचा एकत्रित तक्ता

दि. ३१/०८/२०२५

**पदनाम — सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण संचालक**

**एकूण मंजूर पदे —** **कार्यरत पदे —** **रिक्त पदे —**

**प्रत्यक्ष भरावयाची पदे —**

अनुदानित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर कार्यालयाचे अद्यावत अनुज्ञेय पदमान्यता पत्र.
**(दिनांक ०१/१०/२०२५ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय) सोबत पत्राची प्रत जोडावी.**

अ) जा.क्रं.विससं/उशि/कोवि/——————————
ब) जा.क्रं.विससं/उशि/कोवि/——————————
क) जा.क्रं.विससं/उशि/कोवि/——————————

**प्रत्यक्ष भरावयाच्या पदानुसार** (खालील तक्ता भरण्यात यावा) —

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि. जा. अ | भ. ज. ब. | भ. ज. क. | भ. ज. ड. | वि. मा. प्र. | इ. मा. व | साशैमाप्र | आ. दु. घ. | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण मंजूर पदे (दि.०१/१०/२०२५ नुसार) | | | | | | | | | | | | |
| भरण्यात आलेली पदे | | | | | | | | | | | | |
| एकूण रिक्त पदे | | | | | | | | | | | | |
| भरतीस परवानगी देण्यात आलेली पदे (विभागीय सहसंचालक यांनी मान्यता दिलेली) | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | | | | | | | | | | | | |
| महिला ३०% | | | | | | | | | | | | |
| खेळाडू ५% | | | | | | | | | | | | |
| # दिव्यांग ४% | | | | | | | | | | | | |
| अनाथ १% | | | | | | | | | | | | |

**# दिव्यांगासाठी आरक्षण खालील प्रमाणे राहील —**

<table>
<tr><td rowspan="4">दिव्यांग आरक्षण</td><td>अनुशेष पदे</td><td>दिव्यांग गट</td><td>चालू भरती वर्षातील पदे</td><td>दिव्यांग गट</td><td>एकूण</td></tr>
<tr><td rowspan="3"></td><td>गट अ —</td><td rowspan="3"></td><td>गट अ —</td><td rowspan="3"></td></tr>
<tr><td>गट ब —</td><td>गट ब —</td></tr>
<tr><td>गट क —</td><td>गट क —</td></tr>
</table>

दि. / /२०२६ नियुक्ती प्राधिकारी/अध्यक्ष/सचिव
सही व शिक्का

संस्था सिल

**टिप —** विशेष कक्ष विभागाच्या वतीने दि. २० एप्रिल, २०२६ ते २४ एप्रिल, २०२६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण संचालक या सवंर्गातील प्राथमिक बिंदूनामावली तपासणी शिबीरामधील महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांनी समांतर आरक्षण प्रमाणित करणेबाबत प्रस्ताव सादर करतेवळी सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

- अनुदानित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर कार्यालयाचे अद्यावत अनुज्ञेय पदमान्यता पत्र. (दिनांक ०१/१०/२०२५ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय) सोबत पत्राची प्रत
- विशेष कक्ष विभागाच्या वतीने देण्यात आलेले प्राथमिक बिंदूनामावली तपासणी बाबतचे पत्राची प्रत.
- परिशिष्ट — ब
- परिशिष्ट — ब (प्रत्यक्ष भरावयाची पदे)
- प्रपत्र — अ (दिव्यांग समांतर आरक्षणाबाबतचा)
- मावक, पुणे कार्यालयाकडून अंतिम तपासणी पुर्ण झाली असल्या त्याची प्रत.